# School Connect

Different Activities under School Connect

# Data for 2025-26(Current)

| Sr. No. | School Visited | Students Present during Program | Data Uploaded on MSBTE Portal |
|---|---|---|---|
| 1. | 91 | 4620 | 4620 |

लोकमत

# दहावीनंतर तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय

## सी. डी. गोळघाटे : तंत्रनिकेतन प्रवेशाची संधी : प्लेसमेंटची दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, तंत्रनिकेतनकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा यासाठी व या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घ्यावा, यासाठी स्कूल कनेक्ट कार्यक्रमाविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे यांनी केले.

गोंदिया, तिरोडा व गोरेगाव तालुक्यांतील शिक्षकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्कूल कनेक्ट उपक्रमात जिल्ह्यातील १७७ शासकीय, निमशासकीय तसेच खासगी शाळांना सहभागी करून घेण्यात आले होते. दहावी झाल्यानंतर करिअरचे अनेक पर्याय विद्यार्थ्यांसमोर आहेत. मात्र तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय असून या क्षेत्रात करिअर करताना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रशिक्षण यामधील फरक या वेळी त्यांनी समजावून सांगितला. शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे सहा विद्याशाखा असून येथे शिक्षणाची उत्तम सोय उपलब्ध आहे. या ठिकाणी लागणाऱ्या शैक्षणिक शुल्काबाबतही प्राचार्यांनी माहिती दिली.

मुख्याध्यापक एन. एस. कुंभारे, यू. एस. चिंधालोरे, व्ही. एस. फुलबांधे, व्ही. एस. माने, ए. बी. हरडे, आर. वाय. कटरे, एम. एल. पटले, के. एस. वैद्य, आर. डी. गेडाम व ए. जी. टेंभरे प्रत्यक्ष उपस्थित होते. शासकिय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची विविध कंपनीत झालेल्या प्लेसमेंटची माहिती अनुविद्युत व दूरसंचार विभागाचे अधिव्याख्याता भूपेंद्र देशमुख यांनी दिली.

### अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर संधी कुठे

- अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर भविष्यात कुठल्या कुठल्या संधी उपलब्ध आहेत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सरकारच्या मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया व स्किल इंडिया योजनेतही संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांची रुची वाढविण्यास मदत

- स्कूल कनेक्ट हा उपक्रम विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा असून त्यांच्यामध्ये तंत्रनिकेतनविषयी जागरूकता निर्माण करावी. शाळेत प्रकल्प प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, कोडिंग, ड्रोन, रोबोटिक्स व इलेक्ट्रॉनिक या विषयावर प्रदर्शन आयोजित करण्यात यावेत, असे सांगितले. शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाचे इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख तसेच स्कूल कनेक्ट उपक्रमाचे समन्वयक प्रशांत शर्मा यांनी केले. शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल शासकीय तंत्रनिकेतन येथे घेऊन यावी, ज्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयातील रुची वाढेल असेही सांगितले.

Hello Gondia
Page No. 2 Jun 29, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# दहावीनंतर काय शिकले तर नोकरी लवकर मिळेल सर?

## नव्या काळाशी सुसंगत शिक्षणक्रमांचा विचार करण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : दहावीचा निकाल जाहीर होताच पुढील शिक्षणक्रमांच्या प्रवेशासाठी धावपळ सुरू झाली आहे. चांगली नोकरी किंवा रोजगार मिळवून देणाऱ्या शिक्षणक्रमांच्या शोधात पालक आहेत. या स्थितीत शिक्षणतज्ज्ञांनी चाकोरीबाहेरचे अनेक अभ्यासक्रम सुचविले आहेत. बदलत्या काळातील शिक्षणक्रमातून उमेदवारांना व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात मोठी मागणी आहे. आरोग्य, तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर व हार्डवेअर, जनुकीय संशोधने, अभियांत्रिकी, बायो टेक्नॉलॉजी, पॅरामेडिकल कोर्सेस, डिप्लोमा अभियांत्रिकीतील नवनवे अभ्यासक्रम, ॲनिमेशन, डिझायनिंग, असे अनेक पर्याय आहेत. आयटीआय करूनही करियर घडविता येते. फूड टेक्नॉलॉजी, मेटॅलर्जीकडे विद्यार्थी वळत नाहीत, परिणामी कमी टक्केवारी असलेल्या विद्यार्थ्यांनाही सहज प्रवेश मिळतो.

### काय केले तर कशाच्या संधी?

#### कॉमर्स

वाणिज्य शाखेनंतर नोकरीच्या अनेक संधी आहेत. बी.कॉम., एम.कॉम. तरुणांना खासगी बहुराष्ट्रीय कंपन्यांत मोठी मागणी आहे. शिवाय सिमा, सीए, बँकिंगसाठीही मागणी वाढत आहे. वाणिज्य शाखेत प्रवेशही फुल्ल होत आहेत.

- प्राचार्य सुरेश शेजाळ, जी. ए. वाणिज्य महाविद्यालय, सांगली

#### सायन्स

विज्ञान शाखेतून पुढे करियरच्या असंख्य अभ्यास शाखा उपलब्ध आहेत. वैद्यकीय अभियांत्रिकीसोबतच जैवतंत्रज्ञान, स्पर्धा परीक्षा, पॅरामेडिकल अभ्यासक्रमांचे दरवाजे खुले होतात. चिकाटीने अभ्यास केल्यास करियर घडू शकते.

- प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, विलिंग्डन महाविद्यालय.

#### आयटीआय

आयटीआयने अनेक नवनवे कालसुसंगत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ते पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. अभियांत्रिकीलाही प्रवेश मिळतो. तरुण स्वयंरोजगार सुरू करू शकतात.

- प्राचार्य यतीन पारगावकर, शासकीय आयटीआय, सांगली

#### नवी क्षेत्रे

विद्यार्थ्यांनी करियरसाठी पारंपरिक अभ्यासक्रमांसोबतच नवनव्या कालसुसंगत क्षेत्रांचाही विचार करावा. हवाई क्षेत्र, संगणक विश्वात वेबसाईट डिझाईन, ॲनिमेशन, वैद्यकीय संशोधन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक संधी आहेत.

- प्राचार्य ए. आर. कनाई, डांगे शैक्षणिक संकुल, आष्टा

#### अभियांत्रिकी

अभियांत्रिकीमध्ये डिप्लोमा तसेच डिग्री पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना उद्योग, व्यवसाय क्षेत्रात करियरचे दरवाजे खुले होतात. डिप्लोमानंतर थेट द्वितीय वर्ष डिग्रीला प्रवेश मिळतो. स्पर्धा परीक्षांची तयारीही होते.

- प्राचार्य नितीन सोनजे, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

#### इतर क्षेत्र

विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणक्रमांशिवाय हटके अभ्यासक्रमांचाही विचार करायला हवा. विद्यापीठांनी अनेक नवनवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ते पूर्ण केल्यावर नोकऱ्याही लगेच मिळतात. यामुळे विद्यार्थ्यांचा तिकडे ओढा आहे.

- नामदेव माळी, उपशिक्षणाधिकारी.

Hello Sangli
Page No. 8 Jun 29, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

१३ ऑगस्टला तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होणार

# पॉलिटेक्निक प्रवेशासाठी दीड लाख अर्ज


लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत पॉलिटेक्निक पदवी प्रवेशाची अर्ज प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत यासाठी १ लाख ५५ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील सव्वा लाख विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क भरून अर्जाची निश्चितीही केली आहे. दरम्यान, १३ ऑगस्ट रोजी अर्ज निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी अलॉटमेंटचे पुढील वेळापत्रक जाहीर होणार आहे.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी जूनच्या पहिल्या आठवड्यापासूनच पॉलिटेक्निक प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्यातील ३६४ पॉलिटेक्निक महाविद्यालयांची प्रवेश क्षमता १,०१,२२४ असून त्यासाठी आतापर्यंत १ लाख ५५ हजार अर्ज नोंदणी झाली आहे.

पॉलिटेक्निक प्रवेशासाठी करण्यात येणाऱ्या अर्ज नोंदणीची मुदत संपल्याने त्यात आणखी एका आठवड्याची वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना येत्या ११ ऑगस्टपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. त्यामुळे आतापर्यंत झालेल्या अर्जनोंदणीत निश्चित आणखी काही हजारांची भर पडणार असल्याचा विश्वास संचालनालयाकडून व्यक्त होत आहे.

## पॉलिटेक्निक महाविद्यालयांची स्थिती




## पॉलिटेक्निककडे कल का?

विद्यार्थ्यांचा पदविका अभ्यासक्रमांकडे वाढणार कल, औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार पॉलिटेक्निक अभ्यासक्रमामध्ये करण्यात येणारे बदल, शिक्षकांचे वेळोवेळी होणारे प्रशिक्षण, शिवाय उद्योग व्यावसायिक संस्था आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित संस्थांशी आवश्यक करार व संवाद यामुळे पॉलिटेक्निक प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची अर्जनोंदणी आणि प्रत्यक्ष प्रवेश वाढत आहेत.

Mumbai Main
Page No. 3 Aug 06, 2022
Powered by: erelego.com

# आयटीआय उत्तीर्णांना आता थेट पॉलिटेक्निकच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश

## उदय सामंत यांची माहिती : तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला प्रारंभ

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आयटीआयचा कोणताही ट्रेड घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना आता थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांच्या कोणत्याही शाखेत प्रवेशाची संधी मिळेल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत असलेल्या आणि दहावीनंतरच्या पॉलिटेक्निक या पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रियेचा प्रारंभ वडाळा येथील विद्यालंकार तंत्रनिकेतन महाविद्यालयात गुरुवारी उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

पॉलिटेक्निकला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून त्यात आणखी भर पडावी यासाठी तीन महत्त्वाचे बदलही करण्यात आले आहेत. या नव्या बदलांमुळे राज्यातील सुमारे १० हजार विद्यार्थ्यांना फायदा होणार असल्याचेही सामंत यांनी यावेळी सांगितले.

यंदाच्या २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी होत असलेल्या पॉलिटेक्निक या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीचे सविस्तर वेळापत्रक, प्रवेश प्रक्रियेचा तपशील, उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना तसेच ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमाच्या वेळी संचालक डॉ. अभय वाघ, सहसंचालक प्रमोद नाईक, विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या उपप्राचार्य वर्षा भोसले, विद्यालंकार पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. आशिष उकिडवे तसेच तंत्रनिकेतन महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### प्रत्येक शाखेत २ जागा राखीव

- कोविड-१९ मध्ये दोन्ही पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना पदविका प्रवेशासाठी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेतील प्रत्येक शाखेत २ जागा राखून ठेवण्यात येणार आहेत. या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या स्वनाथ योजनेअंतर्गत पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षणासाठी प्रत्येक वर्षी ५० हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार असल्याची माहिती उदय सामंत यांनी यावेळी दिली.

### प्रवेशाच्या फेऱ्या दोनऐवजी तीन

कोरोनामुळे गतवर्षी प्रवेश प्रक्रिया कमी कालावधीत व्हावी यासाठी प्रवेशाची एक फेरी कमी करण्यात आली होती. यंदा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा यासाठी यंदा केंद्रिभूत प्रवेशाच्या फेऱ्यांची संख्या २ वरून ३ करण्यात आल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### ६ लाख विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेशाची माहिती

पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात वाढ होण्याच्या अनुषंगाने समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम इत्यादी कार्यक्रमांद्वारे पदविका अभ्यासक्रमांच्या अध्यापकांनी व संस्थांनी सकारात्मक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. यामुळे पदविका अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. मागील तीन वर्षात पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशात प्रतिवर्षी सरासरी १० टक्के याप्रमाणे वाढ झाली आहे. यंदा आणखी वाढ होण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय ६ लाख ५० हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले आहे, अशी माहिती संचालक अभय वाघ यांनी यावेळी दिली.


उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत
तंत्रशिक्षण संचालनालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
व
सी. एस. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
आणि सी. एस. कालेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने
स्कूल कनेक्ट कार्यक्रम 2.0
CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE OF PHARMACY
WELCOME
GPS Map Camera
Deori, Maharashtra, India
398f+856, Deori, Maharashtra 441901, India
Lat 21.065884° Long 80.37271°
13/01/25 01:02 PM GMT +05:30
Google




उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत
तंत्रशिक्षण संचालनालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई
व
KRISHNA SAHAYOGI TANTRA SHIKSHAN SANSTHA
CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE OF PHARMACY
(D.Pharm & B.Pharm)
WELCOME

महिन्यांच्या कारावासाचे आदेश दिले आहे.

## स्कुल कनेक्ट उपक्रम आज

देवरी : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालय व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई व छत्रपती शिवाजी संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने तसचे सी. एस. इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि सी. एस. कॉलेज ऑफ फार्मसी यांचे तर्फे स्थानिक छत्रपती शिवाजी संकुल येथे १३ जानेवारीला स्कूल कनेक्ट या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी झामसिंग येरणे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उमेश नागदेवे, सौ. कांचन एस. मानकर, डॉ. मनोज बी. डायगव्हाणे, डॉ. चंद्रहास गोलघाटे, अनिलकुमार येरणे यांच्या उपस्थितीत या स्कूल कनेक्ट कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे












SHARDA
HIGH SCHOOL & JUNIOR
EXPLORING NEW IDEAS






NUTAN ENGLISH
(VNVCG) PLAY GROUP, NURSERY, K.G.I.II & Std.1 St To 10 th.

# School Connect 2022-23

| अ.क्र | भेट दिलेल्या शाळांची एकून संख्या | कार्यक्रमास उपस्थित एकून विद्यार्थी संख्या | MSBTE वेबसाईट वर एकून भरलेली विद्यार्थी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 01 | 125 | 6279 | 6279 | |

# School Connect 2022-23

- गोंदिया जिल्ह्यातील (गोंदिया, गोरेगाव , तिरोडा तालुका) १२५ शाळाना (Online/Offline) माध्यमातून भेट देऊन ६२७९ विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यात आली.

- WhatsaApp च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे २४ ग्रुप बनवण्यात आले असून १६५५ विद्यार्थ्यांना WhatsApp च्या माध्यमातून पदविका प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ बद्दल माहिती प्रसारित करण्यात आली.

- ४६२४ विद्यार्थ्यांना सामान्य सन्देश प्रणाली (Simple Text Message) तसेच gov.in.website च्या Quick SMS facility द्वारे प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ बद्दल माहिती प्रसारित करण्यात आली.

- गोंदिया जिल्ह्यातील 3 तालुक्यातील ३० वेगवेगळ्या शाळाना प्रत्यक्ष भेट देऊन संस्थे विषयी माहिती देणारे ३० बेनर (FLEX 6 X 4) लाऊन विद्यार्थ्यांचे करियर मार्गदर्शन व् समुपदेशन करण्यात आले.


- गोंदिया जिल्ह्यातील वेगवेगळ्या स्थानिक वृतपत्रात संस्थे विषयी माहिती देणारे तसेच पदविका प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ दिनांक 0२/०६/२०२२ पासून शुरू झालेली आहे असी बातमी प्रसारित करण्यात आली.

- गोंदिया जिल्यातील ३ तालुकामध्ये ३५ Street Banner लावण्यात आले.

- दिनांक २२/०६/२०२२ रोजी संस्थेत प्राचार्यांची गोंदिया जिल्यातील ३ तालुक्यातील वेगवेगळ्या शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकान्सोबत बैठक घेण्यात आली असून विद्याथ्यांना पदविका प्रवेश प्रक्रीये बद्दल माहिती द्यावी असे सांगण्यात आले

- इयत्ता १० वी ची गुणपत्रिका वितरण दि.०५/०७/२०२२ पासून सुरु झालेले असून, गुणपत्रिका घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थांनी त्यांच्या संस्थेत पदविका प्रवेश प्रक्रिया बद्दल माहिती दिली व नोंदणी करण्यास प्रोत्साहित केले.

# School Connect Program at all Taluka in Gondia District



# School Connect Program Conducted in Goregaon, Tiroda and Gondia Taluka












# School Connect Program Conducted in Goregaon, Tiroda and Gondia Taluka









# School Connect Program Conducted in Goregaon, Tiroda and Gondia Taluka









# School Connect Program Conducted in Goregaon, Tiroda and Gondia Taluka






# Flex Banner and Leaflet for Publicity



# Flex Banner and Leaflet for Publicity









# Street Banner for Publicity









# Media Publicity Of Institute Through Local Newspaper

लोकमत

१३ ऑगस्टला तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होणार

## पॉलिटेक्निक प्रवेशासाठी दीड लाख अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत पॉलिटेक्निक पदवी प्रवेशाची अर्ज प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत यासाठी १ लाख ५५ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील सव्वा लाख विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क भरून अर्जाची निश्चितीही केली आहे. दरम्यान, १३ ऑगस्ट रोजी अर्ज निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी तंत्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी अलॉटमेंटचे पुढील वेळापत्रक जाहीर होणार आहे.

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी जूनच्या पहिल्या आठवड्यापासूनच पॉलिटेक्निक प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज नोंदणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. राज्यातील ३६४ पॉलिटेक्निक महाविद्यालयांची प्रवेश क्षमता १,०१,२२४ असून त्यासाठी आतापर्यंत १ लाख ५५ हजार अर्ज नोंदणी झाली आहे.

पॉलिटेक्निक प्रवेशासाठी करण्यात येणाऱ्या अर्ज नोंदणीची मुदत संपल्याने त्यात आणखी एका आठवड्याची वाढ करण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना येत्या ११ ऑगस्टपर्यंत प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. त्यामुळे आतापर्यंत झालेल्या अर्जनोंदणीत निश्चित आणखी काही हजारांची भर पडणार असल्याचा विश्वास संचालनालयाकडून व्यक्त होत आहे.

### पॉलिटेक्निक महाविद्यालयांची स्थिती




### पॉलिटेक्निककडे कल का?

विद्यार्थ्यांचा पदविका अभ्यासक्रमांकडे वाढणार कल, औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार पॉलिटेक्निक अभ्यासक्रमामध्ये करण्यात येणारे बदल, शिक्षकांचे वेळोवेळी होणारे प्रशिक्षण, शिवाय उद्योग व्यावसायिक संस्था आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित संस्थांशी आवश्यक करार व संवाद यामुळे पॉलिटेक्निक प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची अर्जनोंदणी आणि प्रत्यक्ष प्रवेश वाढत आहेत.

Mumbai Main
Page No. 3 Aug 06, 2022
Powered by: erelego.com

मार्गदर्शन ऑनलाइन संवाद में 177 शासकीय, अर्धशासकीय, निजी संस्थानों ने लिया हिस्सा

## 10वीं के बाद तंत्र निकेतन बेहतर विकल्प



### शालाओं में कोडिंग, रोबोटिक्स, ड्रोन सिखाना आवश्यक

## आयटीआय उत्तीर्णांना आता थेट पॉलिटेक्निकच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश

उदय सामंत यांची माहिती : तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला प्रारंभ

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

### प्रत्येक शाखेत २ जागा राखीव

# Media Publicity Of Institute Through Local Newspaper

लोकमत

## दहावीनंतर तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय

### सी. डी. गोळघाटे : तंत्रनिकेतन प्रवेशाची संधी : प्लेसमेंटची दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, तंत्रनिकेतनकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा यासाठी व या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घ्यावा, यासाठी स्कूल कनेक्ट कार्यक्रमाविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे यांनी केले.

गोंदिया, तिरोडा व गोरेगाव तालुक्यांतील शिक्षकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्कूल कनेक्ट उपक्रमात जिल्ह्यातील १७७ शासकीय, निमशासकीय तसेच खासगी शाळांना सहभागी करून घेण्यात आले होते. दहावी झाल्यानंतर करिअरचे अनेक पर्याय विद्यार्थ्यांसमोर आहेत. मात्र तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय असून या क्षेत्रात करिअर करताना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रशिक्षण यामधील फरक या वेळी त्यांनी समजावून सांगितला. शासकिय तंत्रनिकेतन गोंदिया येथे सहा विद्याशाखा असून येथे शिक्षणाची उत्तम सोय उपलब्ध आहे. या ठिकाणी लागणाऱ्या शैक्षणिक शुल्काबाबतही प्राचार्यांनी माहिती दिली.

मुख्याध्यापक एन. एस. कुंभारे, यू. एस. चिंधालोरे, व्ही. एस. फुलबांधे, व्ही. एस. माने, ए. बी. हरडे, आर. वाय. कटरे, एम. एल. पटले, के. एस. वैद्य, आर. डी. गेडाम व ए. जी. टेंभरे प्रत्यक्ष उपस्थित होते. शासकिय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची विविध कंपनीत झालेल्या प्लेसमेंटची माहिती अनुविद्युत व दूरसंचार विभागाचे अधिव्याख्याता भूपेंद्र देशमुख यांनी दिली.

#### अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर संधी कुठे

- अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर भविष्यात कुठल्या कुठल्या संधी उपलब्ध आहेत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सरकारच्या मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया व स्किल इंडिया योजनेतही संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

#### विद्यार्थ्यांची रुची वाढविण्यास मदत

- स्कूल कनेक्ट हा उपक्रम विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा असून त्यांच्यामध्ये तंत्रनिकेतनविषयी जागरूकता निर्माण करावी. शाळेत प्रकल्प प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, कोडिंग, ड्रोन, रोबोटिक्स व इलेक्ट्रॉनिक या विषयावर प्रदर्शन आयोजित करण्यात यावेत, असे सांगितले. शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाचे इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख तसेच स्कुल कनेक्ट उपक्रमाचे समन्वयक प्रशांत शर्मा यांनी केले. शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल शासकीय तंत्रनिकेतन येथे घेऊन यावी, ज्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयातील रुची वाढेल असेही सांगितले.

Hello Gondia
Page No. 2 Jun 29, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

## दहावीनंतर काय शिकले तर नोकरी लवकर मिळेल सर?

### नव्या काळाशी सुसंगत शिक्षणक्रमांचा विचार करण्याची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

सांगली : दहावीचा निकाल जाहीर होताच पुढील शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी धावपळ सुरू झाली आहे. चांगली नोकरी किंवा रोजगार मिळवून देणाऱ्या शिक्षणक्रमांच्या शोधात पालक आहेत. या स्थितीत शिक्षणतज्ज्ञांनी चाकोरीबाहेरचे अनेक अभ्यासक्रम सुचविले आहेत. बदलत्या काळातील शिक्षणक्रमातून उमेदवारांना व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रात मोठी मागणी आहे. आरोग्य, तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर व हार्डवेअर, जनुकीय संशोधने, अभियांत्रिकी, बायो टेक्नॉलॉजी, पॅरामेडिकल कोर्सेस, डिप्लोमा अभियांत्रिकीतील नवनवे अभ्यासक्रम, ॲनिमेशन, डिझायनिंग, असे अनेक पर्याय आहेत. आयटीआय करूनही करियर घडविता येते. फूड टेक्नॉलॉजी, मेटॅलर्जीकडे विद्यार्थी वळत नाहीत, परिणामी कमी टक्केवारी असलेल्या विद्यार्थ्यांनाही सहज प्रवेश मिळतो.

#### काय केले तर कशाच्या संधी?

**कॉमर्स**

वाणिज्य शाखेनंतर नोकरीच्या अनेक संधी आहेत. बी.कॉम., एम.कॉम. तरुणांना खासगी बहुराष्ट्रीय कंपन्यांत मोठी मागणी आहे. शिवाय सिमा, सीए, बँकिंगमध्येही मागणी वाढत आहे. वाणिज्य शाखेत प्रवेशही फुल्ल होत आहेत.

- प्राचार्य सुरेश शेजाळ, जी. ए. वाणिज्य महाविद्यालय, सांगली

**सायन्स**

विज्ञान शाखेतून पुढे करियरच्या असंख्य अभ्यास शाखा उपलब्ध आहेत. वैद्यकीय अभियांत्रिकीसोबतच जैवतंत्रज्ञान, स्पर्धा परीक्षा, पॅरामेडिकल अभ्यासक्रमांचे दरवाजे खुले होतात. चिकाटीने अभ्यास केल्यास करियर घडू शकते.

- प्राचार्य डॉ. भास्कर ताम्हणकर, विलिंग्डन महाविद्यालय.

**आयटीआय**

आयटीआयने अनेक नवनवे कालसुसंगत अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ते पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. अभियांत्रिकीलाही प्रवेश मिळतो. तरुण स्वयंरोजगार सुरू करू शकतात.

- प्राचार्य यतीन पारगावकर, शासकीय आयटीआय, सांगली

**नवी क्षेत्रे**

विद्यार्थ्यांनी करियरसाठी पारंपरिक अभ्यासक्रमांसोबतच नवनव्या कालसुसंगत क्षेत्रांचाही विचार करावा. हवाई क्षेत्र, संगणक विश्वात वेबसाईट डिझाईन, ॲनिमेशन, वैद्यकीय संशोधन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक संधी आहेत.

- प्राचार्य ए. आर. कनाई, डांगे शैक्षणिक संकुल, आष्टा

**अभियांत्रिकी**

अभियांत्रिकीमध्ये डिप्लोमा तसेच डिग्री पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना उद्योग, व्यवसाय क्षेत्रात करियरचे दरवाजे खुले होतात. डिप्लोमानंतर थेट द्वितीय वर्षे डिग्रीला प्रवेश मिळतो. स्पर्धा परीक्षांची तयारीही होते.

- प्राचार्य नितीन सोनजे, शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

**इतर क्षेत्र**

विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणक्रमाशिवाय हटके अभ्यासक्रमांचाही विचार करायला हवा. विद्यापीठांनी अनेक नवनवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. ते पूर्ण केल्यावर नोकऱ्याही लगेच मिळतात. यामुळे विद्यार्थ्यांचा तिकडे ओढा आहे.

- नामदेव माळी, उपशिक्षणाधिकारी.

Hello Sangli
Page No. 8 Jun 29, 2022
Powered by: erelego.com